स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

महाराष्ट्र शासन

अल्पसंख्याक विकास विभाग

दालन क्र. ५२८, मंत्रालय (विस्तार इमारत), मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई ४०० ०३२.

ई मेल: दुरध्वनी क्रमांक : २२८३०६२६

---

क्रमांक : अविवि २०२२ / प्र.क्र. १२ / का.३ दिनांक: ०५ ऑगस्ट, २०२२

# Tender Notice

## संगणक, प्रिंटर्स, स्कॅनर्स, फॅक्स मशीन इ. विक्री करणेसाठी निविदा सूचना.

अल्पसंख्याक विकास विभाग (खुद्द) मधील निर्लेखित केलेले संगणक / सी.पीयू. / मॉनिटर/ प्रिंटर / स्कॅनर / फॅक्स मशीन इ. निविदा पद्धतीने "जेथे आहे तेथून व जशी आहे तशी" या तत्त्वावर विक्री करणे आहे. साहित्याचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | उपकरणांचे नाव | एकूण संख्या |
|---|---|---|
| १. | संगणक (सीपीयू) | ६ |
| २. | संगणक (मॉनिटर) | ४ |
| ३. | स्कॅनर | २ |
| ४. | प्रिंटर | २८ |
| ५. | झेरॉक्स मशीन | ०४ |
| ६. | फॅक्स मशीन | ०१ |
| ७. | पेपर कटींग मशीन | ०१ |
| ८. | कि- बोर्ड | १९ |
| ९. | टोनर | ४१ |
| १०. | माऊस | ८ |
| ११. | टेलीफोन इन्स्ट्रुमेंट | ११ |

२. उपरोक्त साहित्य / वस्तू अल्पसंख्याक विकास विभागाच्या दालन क्रमांक ५२६ (अ), ५ वा मजला (विस्तार), मंत्रालय, मुंबई ०३२ येथे दिनांक ८ ऑगस्ट ते दिनांक १९ ऑगस्ट या कालावधीत कार्यालयीन दिवशी दुपारी ३.०० ते ५.०० या वेळेत (सुटीचे दिवस वगळून) पहावयास उपलब्ध असतील.

३. निविदाधारकाकडे जुने संगणकीय निर्लेखित करण्यात आलेली उपकरणे खरेदी करण्यासाठी E-waste (Management ) Rules, २०१६ अंतर्गत, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने वितरीत केलेला वैध ई-कचरा व्यवस्थापन परवाना असणे बंधनकारक आहे. नसल्यास निविदा स्विकारण्यात येणार नाही.

४. याबाबतच्या अटी व शर्ती सोबत जोडल्या आहेत.

०५ ऑगस्ट २०२२

(श. य. बर्वे)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

अवर सचिव

अल्पसंख्याक विकास विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

अल्पसंख्याक विकास विभाग

महाराष्ट्र शासन

अल्पसंख्याक विकास विभाग (खुद्द) मधील निर्लेखित संगणक, प्रिंटर्स, स्कॅनर्स, फॅक्स मशीन इ. विक्रीची निविदा सूचना.

## अटी व शर्ती

१.अल्पसंख्याक विकास विभाग (खुद्द) मधील निर्लेखित केलेले संगणक / सी.पीयू. / मॉनिटर/ प्रिंटर / स्कॅनर / फॅक्स मशीन इ. निविदा पद्धतीने "जेथे आहे तेथून व जशी आहे तशी" या तत्त्वावर विक्री करणे आहे. साहित्याचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | उपकरणांचे नाव | एकूण संख्या |
|---|---|---|
| १. | संगणक (सीपीयू) | ६ |
| २. | संगणक (मॉनिटर) | ४ |
| ३. | स्कॅनर | २ |
| ४. | प्रिंटर | २८ |
| ५. | झेरॉक्स मशीन | ०४ |
| ६. | फॅक्स मशीन | ०१ |
| ७. | पेपर कटींग मशीन | ०१ |
| ८. | कि- बोर्ड | १९ |
| ९. | टोनर | ४१ |
| १०. | माऊस | ८ |
| ११. | टेलीफोन इन्स्ट्रुमेंट | ११ |

२. उपरोक्त साहित्य / वस्तू अल्पसंख्याक विकास विभागाच्या दालन क्रमांक ५२६ (अ), ५ वा मजला (विस्तार), मंत्रालय, मुंबई ०३२ येथे दिनांक ८ ऑगस्ट ते दिनांक १९ ऑगस्ट या कालावधीत कार्यालयीन दिवशी दुपारी ३.०० ते ५.०० या वेळेत (सुटीचे दिवस वगळून) पहावयास उपलब्ध आहेत.

३. निर्लेखित साहित्य/ वस्तूंची निविदेची रूपये १६,१००/- इतकी कमीत कमी विक्री किंमत निश्चित करण्यात आली आहे. त्यापेक्षा कमी किंमतीची निविदा बाद ठरविण्यात येईल. विभागाने निश्चित केलेल्या विक्रीच्या किंमतीपेक्षा सर्वात जास्त रकमेची निविदा सादर करणाऱ्या निविदाधारकास सदर निविदा प्रक्रियेमध्ये "यशस्वी निविदाधारक" म्हणून घोषित करण्यात येईल.

४. खरेदीदाराने खरेदी करावयाचे साहित्य / वस्तुंचे दर (देकार) विहित नमुन्यामध्ये बंद लिफाफ्यात (लिफाफा क्र.२) दिनांक ८ ऑगस्ट २०२२ ते दिनांक १९ ऑगस्ट २०२२ या कालावधीत दिनांक १९ ऑगस्ट २०२२ रोजी सायंकाळी ५.०० वाजण्यापूर्वी कक्ष अधिकारी (कार्यासन-३), अल्पसंख्याक विकास विभाग, पाचवा मजला, विस्तार इमारत, मंत्रालय, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मुंबई- ४०० ०३२ यांच्याकडे पोहोचतील या बेताने सादर करावे. विहीत वेळेनंतर सादर केलेल्या व विहित वेळेनंतर पोस्टाने पाठविलेल्या निविदा स्विकारण्यात येणार नाहीत. यास्तव, आपली निविदा वरील कार्यालयात अंतिम दिनांकापूर्वी व वेळेत पोहचविण्याची जबाबदारी संबंधित निविदाधारकांची असेल. याबाबत कोणतीही तक्रार स्विकारण्यात येणार नाही. लिफाफ्यावर लिफाफा क्र.१ व लिफाफा क्रमांक २ (दराचा लिफाफा) असे स्पष्टपणे नमूद करण्यात यावे.

५. सदर विक्री ही निविदा पद्धतीने करण्यात येणार असल्याने निविदेच्या बंद लिफाफ्यावर "निर्लेखित संगणक सामुग्री खरेदीसाठी निविदा" तसेच निविदाधारकाचे नाव, पत्ता, ईमेल व दुरध्वनी क्रमांक स्पष्ट नमूद करून निविदा सादर करण्यात यावी.

०५ ऑगस्ट २०२२

अवर/ सचिव

अल्पसंख्याक विकास विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

६.निविदाधारकाने निविदा सादर करतांना पॅनकार्ड, आधारकार्ड तसेच, जुने संगणकीय निर्लेखित करण्यात आलेली उपकरणे खरेदी करण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने वितरीत केलेला वैध ई-कचरा व्यवस्थापन परवाना प्रत लिफाफा क्र. १ मध्ये सादर करणे आवश्यक आहे. लिफाफा क्र.१ मधील कागदपत्रांची पूर्तता करणाऱ्या निविदाधारकांचा लिफाफा क्र. २ ( दराचा लिफाफा) उघडण्यात येईल.

७. निविदा उघडण्याचा दिनांक व वेळ निविदाधारकांना ई-मेल / दुरध्वनीद्वारे कळविण्यात येईल. निविदा उघडण्याच्या वेळी संबंधित निविदाधारकास किंवा त्याच्या प्रतिनिधीस व्यक्तीश: उपस्थित राहता येईल. संबंधित निविदाधारक अनुपस्थित राहिल्यास सदर निविदा उपस्थित निविदाधारक / प्रतिनिधींसमोर उघडण्यात येतील. कोणताही निविदाधारक उपस्थित न राहिल्यास त्यांच्या अनुपस्थित निविदा उघडण्यात येतील. याबाबत अनुपस्थित निविदाधारकांची कोणतीही तक्रार स्विकारण्यात येणार नाही.

८. यशस्वी निविदाधारकाने निविदेत नमूद केलेल्या रकमेचा कार्यालयीन ५ (पाच) दिवसांत ( सुटीचे दिवस वगळून) कक्ष अधिकारी, (रोखशाखा), अल्पसंख्याक विकास विभाग, दालन क्रमांक ५२८, पाचवा मजला, विस्तार इमारत, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे रोख किंवा डिमांड ड्राफ्ट द्वारे भरणा करणे आवश्यक आहे. अन्यथा, त्यांची निविदा रद्दबातल ठरविली जाईल व उपरोक्त अ.क्र.८ मध्ये नमुद केलेल्या निवड प्रक्रीयेनुसार द्वितीय क्रमांकाच्या रकमेची निविदा सादर करणाऱ्या निविदाधारकास यशस्वी निविदाधारक म्हणून घोषित करण्यात येईल.

९.यशस्वी निविदाधारकाने निविदेची रक्कम भरणा केल्यानंतर पाच दिवसात सदर साहित्य / वस्तू आहे त्या ठिकाणावरून स्वखर्चाने ताब्यात घेणे आवश्यक राहील. त्यासाठी अल्पसंख्याक विकास विभागामार्फत कोणतेही मनुष्यबळ किंवा इतर खर्च देण्यात येणार नाही. तसेच, निविदा मंजूरीनंतर सदर साहित्य / वस्तू वाहतूक करतांना / ताब्यात घेतांना आवश्यक असलेले शुल्क / कराचा भरणा किंवा अनुषंगीक खर्चाची जबाबदारी संबंधित निविदाधारकाची राहील.

१०.यशस्वी निविदाधारकाने रक्कम भरणा केल्यानंतर कोणत्याही कारणास्तव साहित्य/वस्तू घेण्यास नकार दिल्यास त्याने जमा केलेली रक्कम कोषागारात जमा करण्यात येईल. व सदर रक्कम कोणत्याही परिस्थीतीत संबंधीत निविदाधारकास परत करण्यात येणार नाही.

११. निविदेबाबत निविदाधारकाची कोणतीही अट / शर्त स्वीकारण्यात येणार नाही.

१२.कोणतेही कारण न देता निविदा प्रक्रिया कोणत्याही टप्प्यावर थांबविणे / नाकारण्याचे पूर्ण अधिकार अल्पसंख्याक विकास विभाग राखू ठेवत आहे.

१३.यशस्वी निविदाधारकाने साहित्य / वस्तू ताब्यात घेताना कार्यालयाच्या मालमत्तेचे नुकसान झाल्यास त्यांच्याकडून मालमत्तेच्या नुकसानीची भरपाई वसूल करण्यात येईल.

******

०५ ऑगस्ट २०२२

अवर सचिव

अल्पसंख्याक विकास विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

अल्पसंख्याक विकास विभाग
महाराष्ट्र शासन

# निविदा अर्ज नमुना

दिनांक:    ऑगस्ट, २०२२

प्रति,

कक्ष अधिकारी (कार्यासन ३),
अल्पसंख्याक विकास विभाग,
**मंत्रालय, मुंबई.**

विषय: अल्पसंख्याक विकास विभागातील निर्लेखित केलेल्या संगणक/ प्रिंटर्स/ स्कॅनरची विक्री करण्याबाबत.
संदर्भ: अल्पसंख्याक विकास विभागाची दिनांक ०५ ऑगस्ट २०२२ ची निविदा सूचना.

महोदय,

अल्पसंख्याक विकास विभागातील निर्लेखित केलेले संगणक/ प्रिंटर्स व स्कॅनरची विक्री करण्यासंदर्भात महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेल्या निविदा सूचनेस अनुसरून मी सदर निविदा प्रक्रीयेमध्ये भाग घेऊ इच्छितो आहे. मी अल्पसंख्याक विकास विभागामार्फत विक्री करण्यात येत असलेल्या साहित्याची / वस्तूंची पाहणी केली असून संदर्भाधीन निविदा सुचनेतील सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत.

## निविदा दरपत्रक

| अ.क्र. | उपकरणांचे नाव | एकूण संख्या | एकूण निविदा दर (रुपये) |
|---|---|---|---|
| १. | संगणक (सीपीयू) | ६ | |
| २. | संगणक (मॉनिटर) | ४ | |
| ३. | स्कॅनर | २ | |
| ४. | प्रिंटर | २८ | |
| ५. | झेरॉक्स मशीन | ०४ | |
| ६. | फॅक्स मशीन | ०१ | |
| ७. | पेपर कटींग मशीन | ०१ | |
| ८. | कि- बोर्ड | १९ | |
| ९. | टोनर | ४१ | |
| १०. | माऊस | ८ | |
| ११. | टेलीफोन इन्स्ट्रुमेंट | ११ | |
| | एकूण | १२५ | |

आपला,

05 ऑगस्ट 2022
अवर सचिव
अल्पसंख्याक विकास विभाग
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

अल्पसंख्याक विकास विभाग
महाराष्ट्र शासन

(निविदा सादर करणाऱ्याचे / संस्थेचे नाव, स्वाक्षरी व पत्ता)